
दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०३ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.२९ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## देशाच्या दूध उत्पादनात पशुवैद्यकांची भूमिका महत्त्वाची

# कार्यकारी संचालक, राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड यांचे जागतिक पशुवैद्यक दिनानिमीत्य प्रतिपादन






**नागपूर । प्रतिनिधी**

मूकबधिर प्राण्यांच्या वेदना व त्रास कमी करत असल्यामुळे शेतकरी पशुवैद्यकांना देवच मानतात अशी भावना श्री एस. रेगुपती, कार्यकारी संचालक, राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड यांनी व्यक्त केली. तशींशीळपरीळरपी रीश एींशपींळरश्र क्ष्ारश्रींह थीज्ञशी या विषयावर नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयात आयोजित जागतिक पशुवैद्यकीय दिनानिमित्य ते बोलत होते. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड, नावार, वेंकटेश्वरा ह्याचरीज पुणे आणि पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयात २७ एप्रिल रोजी जागतिक पशुवैद्यकीय दिन साजरा करण्यात आला, त्यावेळी कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पशुवैद्यक आणि शेतकरी यांच्यातील पवित्र नात्यावर भर दिला, जो पशुवैद्यकांमध्ये देव पाहण्याच्या श्रद्धेसारखेच आहे, ज्यांना बोलता येत नाही अशा प्राण्यांची काळजी घेणे. गरीब पशुपालक व शेतकऱ्यांचा सामाजिक-आर्थिक स्तर उंचावण्यासाठी पशुवैद्यकांनी उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल त्यांनी त्यांचे कौतुक केले. त्यांनी शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी माफसू विद्यापीठाने ने विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहचवण्याचे आवाहन केले. डॉ. शिरीष उपाध्ये, आयोजन अध्यक्ष आणि संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता पशुविद्याशाखा, माफसू यांनी आपल्या प्रास्ताविकात पशु आरोग्य व पशु कल्याण आणि मानवी आरोग्यामध्ये पशुवैद्यकांच्या अमूल्य योगदानाची दखल घेऊन साजरा केल्या जाणाऱ्या जागतिक पशुवैद्यक दिनाचे महत्त्व सांगितले. त्यांचे समर्पण आणि प्राण्यांची काळजी घेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी विशद केली. डॉ. सुखदेव बारबुद्धे, संचालक, आयसीएआर-नॅशनल मीट रिसर्च इन्स्टिटयूट, हैदराबाद हे सन्माननीय अतिथी होते. तसेच डॉ. डी. व्ही. कोलते, देशातील प्रसिद्ध पोल्ट्री ब्रीडर आणि संचालक, वेन्को रिसर्च अँड ब्रीडिंग फार्म, पुणे; जयतीर्थ चारी, उपव्यवस्थापकीय संचालक, मदर डेअरी; डॉ. सतीश राजू, प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन, नागपूर आणि डॉ. अजय पोहरकर, सचिव, नावार आणि अध्यक्ष, महाराष्ट्र पशुवैद्यक परिषद हे सुद्धा सन्माननिय अतिथी म्ह्णून मंचावर उपस्थित होते. तांत्रिक सत्रादरम्यान एनएमआरआय, हैदराबादचे संचालक डॉ. बारबुद्धे; डॉ. विजय तिजारे, वेंकीज इंडियाचे महाव्यवस्थापक; शहरातील प्रसिद्ध नेफ्रोलॉजिस्ट डॉ. धनंजय उकळकर आणि एनडीडीबीचे गट प्रमुख (पशु आरोग्य) डॉ. ए.व्ही. हरिकुमार यांनी संबंधित विषयांवर व्याख्याने दिली. व्हीएनआयटी नागपूरने नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि एनडीडीबी यांच्या संयुक्त विद्यमाने निकृष्ट दर्जाच्या पिकांच्या अवशेषांच्या मूल्यवर्धनसाठी विकसित केलेल्या विमोझाइम या एन्झाइमचे तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे व्यावसायिक खनिज मिश्रण च-ऋडण चळप या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते लॉंच करण्यात आले आणि माफसुचे प्रकाशन माफसू वार्ताचे विमोचन सुद्धा करण्यात आले.या शुभप्रसंगी, वन्यजीव संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र (माफसू) आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. रामानुमन, मुख्य वनसंरक्षक आणि क्षेत्र संचालक यांनी परस्पर सहकार्याविषयी आपले विचार मांडले आणि विद्यार्थ्यांना वन्यजीव पशुवैद्यक होण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात ३५० व्यासायिकांनी सहभाग घेतला ज्यामध्ये पशुवैद्यक अधिकारी, प्राध्यापक व पद्व्यूत्तर विद्यर्थ्यांचा समावेश होता. या कार्यक्रमाला डॉ. नितीन कुरकुरे, संशोधन संचालक, माफसू; डॉ. अनिल भिकाणे, विस्तार संचालक, माफसू; डॉ.सचिन बोंडे, अधिष्ठाता (मत्स्यविज्ञान), माफसू; डॉ. ए. पी. सोमकुवर, सहयोगी अधिष्ठाता, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय यांचा विशेष सहभाग होता. कार्यक्रमाचे संचालन डॉ.श्वेता लेंडे यांनी केले तर आभार डॉ.अतुल ढोक, आयोजन सचिव यांनी व्यक्त केले.

## तळोधी बाळापुर येथील युवक झी म्युझिक कंपनीच्या अल्बममधे

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभिड तालुक्यातील तळोधी बाळापुर येथील युवक राहुल चांदेकर नुकताच प्रदर्शित झालेल्या मोर आशिकी या झी म्युझिक कंपनीच्या छत्तीसगढी संगित अल्बममधे झळकले आहेत. या अल्बममधे गायन छत्तीसगढी गायक तोशांत कुमार आणि मोनिका वर्मा यांनी केलेले आहे. तर एम डी कैफ यांनीसंगितबध्द केलेले आहे.सहकलाकार सोमय्या बिहोर आहेत. या यशाबद्दल राहुल चांदेकर यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. तर या अल्बमला जास्तीत जास्त शेअर आणि लाईक करावे, यु ट्यूब वर जाऊन मोर आशिकी हे गाणे अवश्य बघा असे आवाहन राहुल चांदेकर आणि मित्रमंडळी यांनी केले आहे.




## प्राथमिक शिक्षकांच्या समस्यांचे निवारण न झाल्यास महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेचा आंदोलनाचा इशारा

**मूल । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षकांचे समस्या प्रलंबित असून प्रशासनाला वारंवार निवेदने देण्यात आलेली आहेत पण अजूनही बऱ्याच समस्या प्रलंबित आहेत. त्या समस्यांचे लवकरात लवकर निवारण करा अन्यथा महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक संघटना आंदोलन करेल असा इशारा निवेदनातून दिला आहे. केंद्रप्रमुख, उच्च श्रेणी मुख्याध्यापकांची पदोन्नती ची पदे रिक्त आहेत ती तात्काळ भरण्यात यावी, आदिवासी एकस्तर वेतन श्रेणी वेतन निश्चिती पडताळणी साठी मुळ सेवापुस्तक जिल्हा परिषद लेखा विभागात पाठविण्यात यावे, वरिष्ठ वेतनश्रेणी चे आदेश निर्गमित करण्यात यावे, शैक्षणीक अर्हता मंजुरीचे आदेश निर्गमित करण्यात यावे, व मंजुरीचे अधिकार गटविकास अधिकारी यांना प्रदान करावे, अतिरिक्त प्रभार असलेल्या शिक्षकांना विशेष वेतन देण्यात यावे, वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके तात्काळ मंजूर करण्यात यावे, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात आले त्यांचे आदेश निर्गमित करण्यात यावे, मासिक वेतनास होत असलेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करणे, विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करणे, आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना तात्काळ कार्यमुक्त करणे, संयुक्त शाळा अनुदान सत्राच्या प्रारंभी व दिवाळीनंतर असे दोनच टप्प्यात देण्यात यावे, स्थायी आदेश त्वरित देणे, नवीन नाव धारण मंजुरी आदेश देण्यात यावे यांसह अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले असून समस्या निकाली न निघाल्यास दिनांक ६ जून २०२४ पासून संघटनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आलेला आहे.

## गोविंद शेंडे यांचे निधन

**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

दिनांक २८ एप्रिल २०२४ रविवार ला गिरगाव येथील सद्गृहस्थ श्री गोविंदाजी शेंडे यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी वृध्दापकाळाने दुपारी १२ वाजता निधन झाले त्यांच्या वर गिरगाव येथील स्मशानभूमीत सायंकाळी पाच वाजता अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पुतणे, नातवंडे असा आप्त परिवार आहे.

## केंद्रीय दारूगोळा भांडार पुलगावच्या मंगेश डफरे याला आर्म कुस्तीमध्ये सुवर्णपदक

**पुलगाव । प्रतिनिधी**

नागपुरात झालेल्या ३५ व्या वरिष्ठ महाराष्ट्र राज्य आर्म कुस्ती स्पर्धेत केंद्रीय दारूगोळा भांडार पुलगावचा फायर इंजिन ड्रायव्हर मंगेश डफरे याने आर्म कुस्ती ९० किलो गटात सुवर्णपदक पटकावले.

अंतिम सामन्यात मंगेशने मुंबईच्या खेळाडूचा पराभव करत सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धेत महाराष्ट्रभरातील ३०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. ही स्पर्धा २७ आणि २८ एप्रिल रोजी केडीके अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर येथे पार पडली. या यशाबद्दल सी ए डी कमांडर ब्रिगेडियर कौशलेश पंघाल , फायर मास्टर लेफ्टनंट कर्नल रोहित मन्हास आणि सर्व लष्करी व नागरी अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.



## श्री गोविंद गिरीजी महाराज २ दिवस परभणी दौऱ्यावर

**परभणी । प्रतिनिधी**

प.पु. गुरुवर्य आचार्य स्वामी श्री गोविंद गिरीजी महाराज यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने २९ व ३० एप्रिल रोजी येथील अक्षदा मंगल कार्यालयात स्वामीजींच्या उपस्थितीत 'प्रणिपात पर्व' सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या दोन दिवशीय सोहळ्यात उपनयनसंस्कार उत्सव, संवाद गर्भस्थ शिशुसे यावर व्याख्यान व तुलादान व आशीर्वचन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. विद्यावाचस्पती राष्ट्रसंत गुरुवर्य आचार्य स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून भव्य तुलादान सोहळाही आयोजित करण्यात आला आहे. या स्मरणीय उत्सवात ७५ यजमानांद्वारे तूलादान होणार आहे व स्वामीजींचे आशीर्वचनही होणार आहे. यावेळी गिरीधरजी काळे (पुणे) व सुशील बजाज (हैद्राबाद) हे दोघे उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याचे मुख्य यजमान म्हणून गोविंदप्रसाद अजमेरा हे असणार असून मंगळवारी सकाळी १० वाजता हा तूलादान सोहळा होणार आहे.दरम्यान, या प्रणिपात पर्व सोहळ्याचे संयोजक वेदशास्त्रसंपन्न श्री अतूलगुरु जोशी साळापुरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

## डॉ.शिवाजी रामभाऊ शिंदे यांना दुसऱ्यांदा डॉक्टरेट पदवीने सन्मानित

**सेलू । प्रतिनिधी**

सेलू येथील श्रीमती ल.ला.रा.नूतन कन्या प्रशालेचे सेवानिवृत्त आदर्श ग्रंथपाल डॉ.शिवाजी रामभाऊ शिंदे यांनी कोरोना काळात सर्व शाळा,महाविद्यालये बंद होती.अशातच शासनाने ऑनलाईन शाळा सुरु करून विद्यार्थी वर्गाचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी उपाय करीत ऑनलाईन शाळा महाविद्यालय सुरु केल्या.यानंतर देश विदेशातील नामवंत विद्यापीठानी वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी ऑनलाईन वेबिनार चे आयोजन करून सर्व ग्रंथपालांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते.याच संधीचा फायदा घेत सेलूच्या नूतन कन्या प्रशालेच्या स्व.सौ.दुर्गाताई द.कुलकर्णी स्मृति ग्रंथालयाचे ग्रंथपाल शिवाजी शिंदे यांनी सहभाग घेऊन आपले ग्रंथालय जगातील १०८ विद्यापीठाशी जोडून विवीध उपक्रमांची माहिती सादर केली.वाचन संस्कृती वाढावी म्हणून काय काय उपाययोजना करता येतील,ग्रंथालया समोर काय काय आवाहने आहेत त्यावर काय उपाययोजना करता येतील यावर परखडपणे आपले मत मांडले.विविध वर्तमान पत्रातून वाचल तर वाचल या सदराखाली अनेक लेख प्रकाशित करून विद्यार्थी, शिक्षक,पालक यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचे कार्य केले.ग्रंथ संवर्धनासाठी सेलू शहरासह अनेक वाचणप्रेमी दानशूर व्यक्तींना भेटून त्यांच्या कडून देणगी जमा करून विध्यार्थ्यांना नामवंत साहित्यकांचे ग्रंथ उपलब्ध करून देण्याचे निश्वार्थपणे कार्य केले.याच कार्याची दखल घेत त्याना ०२ ऑक्टोबर २०२२ मध्ये महात्मा गांधी जयंती निमित्ताने इंडियन एम्पायर युनिव्हर्सिटी ऑफ चैन्नई ने पहिल्यांदा दखल घेत डॉक्टरेट या पदवीने सन्मानित करण्यात आले.याचं कार्याची दखल घेत आज पुनः एकदा पं.दिनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ वृंदावन मथुरा च्या वतीने दुसऱ्यांदा विद्या वाचस्पति सारस्वत सम्मान या पदवीने सम्मानित करण्यात आले. भोपाळ येथील पंच तारांकित हॉटेल रेडिसन मध्ये पं. दीनदयाल उपाध्याय हिन्दी विद्यापीठ वृन्दावन मथुरा यांच्या वतीने राष्ट्रीय हिन्दी संगोष्ठी तथा विद्या वाचस्पति सारस्वत सम्मान समारंभाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

हिन्दी भाषा ला राष्ट्रभाषाची मान्यता देण्यासाठी सतत प्रयत्न करण्याचे कार्य सातत्याने या विद्यापीठाच्या



माध्यमातून केले जाते.देशातील नव्हे तर अंतरराष्ट्रीय स्तरावरील अव्वल स्थानी असलेले पं. दीनदयाल उपाध्याय हिन्दी विद्यापीठ , वृन्दावन धाम, मथुरा यांच्या वतीने २४ एप्रिल रोजी भोपाल मध्ये आयोजित भव्य सम्मान समारंभात देशातील विविध राज्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्यांनी उत्कृष्ट कार्य केले आहे अश्या व्यक्तींना विद्या वाचस्पति सारस्वत सन्मानाने सम्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मध्य प्रदेश शासनाचे सेवानिवृत्त न्यायाधीश देवेन्द्र कुमार जैन, अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इन्दु भूषण मिश्रा देवेन्दु तथा विशिष्ट अतिथि माध्य. शिक्षण विभाग, लोक शिक्षण संचालनालय, मध्य प्रदेश शासनाचे सेवानिवृत्त अप्पर अधिकारी पं. धीरेन्द्र चतुर्वेदी तथा मध्य प्रदेश चे मुख्यमंत्री उदय योजना शिक्षण विभागाचे प्रदेश प्रभारी मा. विष्णुकांत कनकने, राष्ट्रीय पर्यावरण तथा विद्यापीठाचे ब्रांड एम्बेसडर डॉ. विश्वनाथ पाणिग्रहिजी,वृंदावन येथील सुप्रसिद्ध भागवत कथा वाचक मा.सुश्री दीपा मिश्रा जी आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. डॉ.शिवाजी रामभाऊ शिंदे यांना दुसऱ्यांदा डॉक्टरेट या पदवीने सन्मानित केल्या बद्धल संस्थेचे माजी सचिव आदरणीय प्राचार्य द.रा.कुलकर्णी, प्रशालेचे शालेय समितीचे अध्यक्ष नंदकिशोरजी बाहेती,कार्यकारणी सदस्य दत्तरावजी पावडे नाना,माजी प्रचार्य डॉ.शरद कुलकर्णी, परभणी जिल्ह्याचे खासदार संजय (बंडू) जाधव, यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.मुकेश हरिभाऊकाका बोराडे, साईबाबा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष हेमंतरावजी आढळकर,सेलू नगरपरिषद चे माजी नगराध्यक्ष विनोदरावजी बोराडे,माजी आमदार विजयरावजी भांबळे,माजी जि. प. बांधकाम सभापती अशोकनाना काकडे, श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.संजयजी रोडगे, सेलू तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती चे उपसभापती प्रकाश प्मुळे, मा.


नगरसेवक मनीष कदम,रघुनाथ बागल, माझे जन्मगावं निपाणी टाकळी चे सरपंच सुनील सावंत,आणि मित्र परिवार आदीने अभिनंदन केले.या पुरस्कारामुळे सेलू शहरासह जिल्हाचे नाव लौकिक झाल्याचे समाधान अनेक मान्यवरांनी व्यक्त केले.

# आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाचे उद्दिष्ट!

**नृत्य हे मानवाच्या अभिव्यक्तीचा अविष्कार आहे. आपल्या शरीराच्या माध्यमातून विविध भावना व्यक्त करण्याचं ते एक माध्यम आहे. मनुष्याच्या आयुष्यात असलेल्या या नृत्याचे महत्व जगाला पटवून देण्यासाठी दरवर्षी २९ एप्रिलला आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा केला जातोय. जगभरात महान नृत्यांगना जीन-जॉर्जेस नवारेच्या वाढदिवसानिमित्त हा उत्सव साजरा करण्यात येत असतो. ज्ञानवर्धक संकलित माहिती श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर लेखातून जाणून घ्या... संपादक.**

दरवर्षी २९ एप्रिल हा दिवस आंतराराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जातो. बॅले नृत्याचे आद्य संस्थापक जीन-जॉर्जेस नोवेर यांचा हा जन्मदिवस. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जावा असे आंतरराष्ट्रीय नाट्यसंस्था- इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूशन- आइटीआइने ठरवले. ही संस्था युनेस्कोची भागीदार असलेली स्वतंत्र संस्था आहे. तिच्या आदेशावरून इ.स.१९८२ सालापासून हा दिवस साजरा करण्यात येत आहे. या दिवशी जगप्रसिद्ध आणि त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट नृत्य कलावंताला जागतिक संदेश देण्यासाठी आमंत्रित केले जाते. नृत्य कलेला आणि नृत्य कलावंताला जगमान्यता मिळावी, या कलेचा उत्कर्ष आणि अधिकाधिक प्रसार व्हावा आणि तिला राजाश्रय मिळावा हा उद्देश, आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा करण्यामागे आहे. नृत्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते भावना व्यक्त करण्याचेही एक साधन आहे. मग ती एखाद्याबद्दलची नाराजी असो किंवा एखादी गोष्ट साध्य करण्याचा उत्साह आणि उत्सव असो, तुमच्या प्रत्येक भावना इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी तुम्ही नृत्याची मदत घेऊ शकता. इतकेच नव्हे तर नृत्याच्या माध्यमातून समाजात जनजागृती करण्याचे कामही वर्षानुवर्षे केले जात आहे.

दि.२९ एप्रिल १९८२ रोजी युनेस्कोच्या इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूटच्या आंतरराष्ट्रीय नृत्य समितीने महान नृत्यांगना जीन-जॉर्जेस नवेराच्या वाढदिवसानिमित्त हा दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस जगभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नृत्यांगना नवेरा ही फ्रान्समधील एक निपुण बॅले डान्सर होती, जीने नृत्यावर लेटर्स ऑन दी डान्स नावाचे पुस्तक लिहिले ज्यामध्ये नृत्याशी संबंधित सर्व गोष्टी आहेत. हे वाचून कोणीही नृत्य शिकू शकेल. आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाचे उद्दिष्ट केवळ जगातील सर्व नर्तकांचे प्रोत्साहन वाढवणे हाच नाही तर या सर्व नृत्य प्रकारांबद्दल लोकांमध्ये जागरुकता पसरवणे हा आहे, ज्यामध्ये जगातील मोठे नेते आणि सरकारे देखील सहभागी आहेत. नृत्य हा स्वतःचा आनंद आहे आणि तो इतरांनाही वाटून घ्यायचा हाही त्याचा उद्देश आहे. पॅरिसमधील इंटरनॅशनल डान्स थिएटर इन्स्टिट्यूट दरवर्षी



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

ऑनलाइन सेलिब्रेशनचे आयोजन करत असते. त्यावेळी आफ्रिका, आशिया, अमेरिका, युरोप आणि अरब देशांतील नृत्यनिर्मितींना आमंत्रित करण्यात येते. या उत्सवाअंतर्गत जगभरातील नृत्यातील वैविध्य आणि सौंदर्य दाखविण्याचा प्रयत्न केला जात असतो. नृत्य हे केवळ एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचाच भाग नव्हे तर काही जणांसाठी नृत्य हे स्ट्रेस बस्टर सुद्धा असते. जगात विविध प्रकारच्या संस्कृती आहेत, त्यांच्या नृत्य प्रकारावरून त्या संस्कृतीचा अंदाज बांधता येतो. नृत्य हे मानवाचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. आपल्या शरीराच्या माध्यमातून विविध प्रकारच्या भावनाना वाट करून देण्याच हे एक उत्तम माध्यम आहे. मनुष्य जीवनातील असलेले नृत्याचे महत्व जगाला पटवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाट्य संस्थाने हा दिवस जगामध्ये



साजरा करायला सुरुवात केली. इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूशन ही युनेस्कोची कला प्रदर्शनासाठी भागिदार संस्था आहे. जगभरातील अनेक प्रसिद्ध डान्सर्स आणि कोरियोग्राफर्स या संस्थेचे सभासद आहेत. या संस्थेने आधुनिक बेले डान्सचा निर्माता समजले जाणारे जॉर्जेस नोवेर यांना सन्मानित करण्यासाठी दरवर्षी २९ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा करण्याचं ठरवलं आहे. जगभर हा दिवस सर्व देशांच्या राजकीय, सामाजिक आणि भौगोलिक सीमा पार पाडून नृत्य करण्याला प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नृत्य ही एक जगातील विविध भागांना त्यांच्या नृत्य प्रकाराने जोडणारी एक भाषा आहे. त्यामुळे फक्त नृत्यकलेच्या माध्यमातून एक सकारात्मक किंवा अर्थपूर्ण संदेश देण्याचा प्रयत्न केला जातो. नृत्याचे प्रकार वेगवेगळे आहेत. अगदी लहान लहान प्रदेशापासून वेगवेगळ्या संस्कृतीची वेगवेगळी नृत्य कला असते- १) बेली डान्स या प्रकाराबद्दल माहिती पाहूया. युरोपमधील लेखक आणि चित्रकारांनी या नृत्य करणाऱ्या जिप्सी महिलांची चित्रे काढल्याने हा नृत्यप्रकाराला युरोपभर लोकप्रियता मिळाली. भटक्या लोकांप्रमाणे बेली डान्सर्सचा एक समूह असायचा, आणि ते फिरतीवर असताना नृत्य करायचे. हा बेली डान्स पाठीचा कणा ताठ ठेवून, कंबरेची जलद गतीने हालचाल करून, त्यासोबतच संपूर्ण शरीर एका लयबद्ध ठेक्यामध्ये हलवणे, अशा प्रकारे करण्यात येणारा बेली डान्स मान आणि पाठीच्या आरोग्यासाठी उत्तम आहे. तसेच हृदयाचं स्पंदन होण्यासाठी, आरोग्य उत्तम राखण्यासाठी हा नृत्यप्रकार अनेक कलाकार व्यवस्थित शिकून घेतात. या नृत्याने एका तासात साधारण ३०० ते ५०० कॅलरीज जाळल्या जातात. २) दुसरा प्रकार आहे हिप हॉप. यामध्ये १९७० मध्ये समोर आलेल्या हिप हॉप या नृत्यप्रकारात अपरॉक, ब्रेकिंग आणि फंक स्टाइल्स या प्रकारांचाही समावेश करण्यात येतो. जमैकन- अमेरिकन डीजे कूल हर्क याला हिप हॉप म्युझिकचा संस्थापक असे संबोधले जाते. हिप हॉप प्रकार अत्यंत ऊर्जादायी आहे. जबरदस्त ऊर्जेनेच तो परफॉर्म करावा लागतो. हिप हॉप संगीतासह स्ट्रीट जॅझ बरोबरही तो केला जातो. हा शांत नृत्य प्रकार नाही. काही निवडक शहरांमध्ये शैक्षणिक कार्यशाळा, प्रकल्प, विविध कार्यक्रम, व्याख्याने आयोजित करण्यात येतात. या कार्यक्रमांतर्गत जगभरामधून एक दिग्गज नृत्य कलाकाराची निवड करून त्यांच्या कडून एक सकारात्मक संदेश दिला जातो. प्रत्येक नृत्यप्रेमींसाठी जणू ही एक पर्वणीच ठरते. गेल्या दोन वर्षांत शांघाय आणि हवाना येथे हे सेलिब्रेशन होते आहे. यामध्ये जगभरातील दिग्गज कलाकार, विद्यार्थी आणि नृत्यप्रेमी आवर्जून हजेरी लावतात.जगभरामध्ये प्रत्येक वर्षी २९ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी हा नृत्य दिवस मोठ्या उत्साहात जगभरात साजरा केला जातो. पण गेल्या दोनतीन वर्षांपासून सुरू झालेला कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता हा दिवस साजरा करण्यावर अनेक निर्बंध घालून बंधने आणली आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी व्हर्चुअल पद्धतीच्या माध्यमाने हा दिवस साजरा केला जात आहे, हे येथे उल्लेखनीयच!

!! विश्व नृत्य दिनाच्या सर्व नृत्यप्रेमी बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# महाराष्ट्र संविधान आणि लोकशाही वाचवण्याची रणभूमी आहे


आज भाजप पक्षाचे सर्वात शक्तिशाली नेतृत्व आणि तथाकथित आधुनिक राजकीय चाणक्यांना २०२४ च्या लोकसभा निवडणुकीबद्दलची मराठी माणसाची धारणा समजत नसल्याने दिल्ली अस्वस्थ झाली आहे. शिवसेनाप्रमुख आदरणीय बाळासाहेब ठाकरे हे २५ वर्षांहून अधिक काळ भाजपला बिनशर्त पाठिंबा देत आहेत हे सर्वांना माहीत आहे.

आणि भाजपसोबत युती करणारा शिवसेना हा पहिला राजकीय पक्ष होता. त्यावेळी भाजप हा धर्मनिरपेक्ष वातावरणात अस्पृश्य पक्ष होता. त्यावेळी प्रत्येक प्रादेशिक राजकीय पक्षांनी भाजपपासून अंतर ठेवले होते.

परंतु प्रमोद महाजन सारख्या सर्वकाळातील सर्वोत्कृष्ट राजकीय संयोजक व्यक्तिमत्वाने प्रत्येक आघाडीच्या राजकीय पक्षाच्या आणि सदस्यांच्या उच्च सन्मानाने सर्व गोष्टींचा योग्य समन्वय साधला.

आणि पहिल्यांदाच महान केंद्र सरकार भाजपने संसदेत सरकार स्थापन केल्याचा दावा केला की भारतातील आघाडीच्या राजकारणाचे सर्वकालीन सर्वोत्तम योजनाकार श्री प्रमोद महाजनजी होते.राजकारणातील युती भागीदारीची ही सुरुवात होती प्रादेशिक राजकीय पक्षांचे नेतृत्व राष्ट्रीय पातळीवरील राजकीय पक्ष करतील आणि भाजप नेते आदरणीय अटलबिहारीजी वाजपेयी ती जबाबदारी अत्यंत संवेदनशीलतेने पार पाडली. आणि दोनदा अटलजींनी भारताचे पंतप्रधान म्हणून अत्यंत यशस्वी आणि दर्जेदार नेतृत्व आणि मानवतेच्या कवी स्पर्शाने भारताचे नेतृत्व केले.दिल्ली सरकारमधील काँग्रेस पक्षाच्या पारंपारिक सत्तेला पर्यायी नेतृत्व देण्यासाठी प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षांच्या सत्तेतील विरोधी पक्षांचा सुवर्णकाळ सुरू झाला आहे.जवळपास एनडीएच्या भागीदारांनी भाजपसोबत भागीदारी सुरू ठेवली आणि भाजपचा आघाडीचा भागीदार म्हणून १० वर्षांच्या दीर्घ कालावधीसाठी विरोधी बाकावर बसले.२०१४ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री श्री नरेंद्रभाई मोदी यांची गोव्यातील पक्ष परिषदेत पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून घोषित करण्यात आलेली भूमिका राष्ट्रीय राजकारणाला वेगळ्या अंगाने वळण देणारी होती.

भाजपसोबत पक्षांची युती अत्यंत सौम्यपणे सुरू होती. त्यांनी अकाली दल शिवसेना आणि नितीश कुमार जनता दल या भाजप आघाडीच्या पक्षांसोबत निवडणूक लढवली. आणि भाजप प्रथमच वैयक्तिकरित्या सत्तेत आला युती भागीदाराच्या मदतीने हे पहिल्या पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी चालू ठेवण्यात आले होते परंतु २०१९ च्या दुसऱ्या निवडणुकीत भाजपने स्वतःच्या रंगात बदल केला होता जो युतीच्या भागीदारांसाठी अज्ञात होता.शेतकऱ्यांवर कारवाई करणाऱ्या केंद्र सरकारच्या निषेधार्थ अकाली दलाच्या केंद्रीय मंत्र्याचा राजीनामा भाजपसोबतची युती संपुष्टात येण्याची ही सुरुवात होती. भाजपने अत्यंत कुशलतेने भाजप सरकारमधून भागीदाराने बाहेर पडावे, असे वातावरण तयार करून ते भाजपसोबत टिकू नयेत यासाठी योग्य ते सर्व नियोजन केले आणि त्यात भाजप यशस्वी झाला. विधानसभा निवडणुकीत शिवसेना काँग्रेस आघाडीत सामील झाली आणि त्यांच्या केंद्रीय मंत्र्यांनी त्यांच्या खात्यांचा राजीनामा दिला आणि ते भाजप सरकारमधून बाहेर पडले.



सतीश सातोंनकर
नानलपेठ परभणी.
९४०३२२२००१.

मग शिवसेनेला उभ्या उभ्या उध्वस्त करण्याची किंवा उध्वस्त करण्याची भव्य योजना केंद्रीय तपास यंत्रणांच्या मदतीने पूर्ण झालेली नैसर्गिक प्रतिक्रिया दिसायला हवी. शिवसेना पक्ष आणि शिवसेना विचारसरणीचे जनक श्री. बाळासाहेब ठाकरे होते. पण पडद्यामागे शिंदे यांचा चेहरा बंडखोर असल्याचा भाजपचा दावा आहे, असा दावा प्रसारमाध्यमांमध्ये केला जात.....? केंद्र सरकारच्या पाठिंब्याने कायदेशीररीत्या बेकायदेशीररीत्या वेगाने घडत असलेल्या गोष्टी महाराष्ट्रातील सामान्य माणसाला धक्का बसला आणि महाराष्ट्रातील राज्यपालांचे घर अतिशय सक्रियपणे राजकीय होते. वेगवान क्शन थ्रिल आणि सस्पेन्स चित्रपटाप्रमाणे सर्व काही घडत होते. भारताचे सर्वोच्च कायदेविषयक सल्लागार लंडनमध्ये बसून भारतात खटला लढवत होते, सर्वकाही अनपेक्षितपणे अविश्वसनीय होते, परंतु हे घडत होते हे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीसाठी अगदी नवीन होते. खरे तर एके काळी शिवसेना पक्षाचे मुख्यमंत्री श्री नारायण राणे भाजपचे सदस्य झाले आणि त्यांना सोडून भाजपमध्ये भाजपचे प्रदेश नेते म्हणून भाजपचे शिवसेनेला आव्हान होते. प्रत्येक चांगल्या किंवा प्रतिष्ठित शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्याला राज्य भाजपने उचलून धरले पण तोपर्यंत शिवसेनेने कधीही तसे केले नाही भाजपने कधीही शिवसेनेत भाजपच्या कोणत्याही नेत्याला स्वीकारले नाही, मैत्रीचा आदर केला. पण मोदींच्या काळातील भाजपची नवी राजकीय शैली प्रत्येक राजकीय पक्षाला माहीत नव्हती आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यासारख्या भाजपसोबतच्या युतीपासून सर्व पक्ष घाबरून बाहेर पडले. ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री श्री रामविलास जी पासवान यांच्या निधनानंतर भाजपने पासवान कुटुंबातील कुटुंबासोबत भांडणे लावली आणि नेहमीप्रमाणेच दूर राहून पाहत राहावे. तीच गोष्ट त्यांनी आंध्रमध्ये चंद्राबाबू नायडूंसोबत केली. पूर्ण बहुमत असलेल्या भाजप सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात त्यांनी कधीही छऊ- हा शब्द वापरला नाही ज्यावेळी त्यांना भजपा सरकार म्हणायचे आज ते मोदी सरकार म्हणत आहेत. पण जेव्हा त्यांना पक्षांतर्गत सर्वेक्षणातून कळले की ते एकटे निवडणूक लढण्यासाठी सुरक्षित स्थितीत नाहीत तेव्हा त्यांना दिल्लीतील सत्ता गमवावी लागू शकते.मग ते एनडीए युतीचे जुने गाणे म्हणू लागले, हा तथाकथित चाणक्याच्या नेतृत्वाखाली नवा भाजप आहे. पण सगळेच नाकारत होते आणि भाजपने केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर त्यांच्या जुन्या मित्रांविरुद्ध करायला सुरुवात केली आणि त्यांना जबरदस्तीने एनडीएचे सदस्य बनवले.

बिहारचे मुख्यमंत्री श्री नितीश कुमार यांच्याबद्दल अभ्यास केल्यास त्यांचा चेहरा आणि शरीर मैत्रीच्या राष्ट्रीय राजकारणातील सध्याच्या राजकीय क्षेत्राबद्दल बरेच काही बोलते. राजकारणात देहबोली खूप महत्वाची आणि इच्छा आणि अनिच्छेतील फरकाची भाषा डीकोड करणारी व्यक्तीने ती अत्यंत काळजीपूर्वक वाचली पाहिजे. आज माननीय पंतप्रधान भाजप आणि युतीच्या भागीदारासाठी दररोज एक जाहीर सभा घेत आहेत. केंद्रीय गृहमंत्रीही महाराष्ट्रात मेहनत घेत आहेत. महाराष्ट्र भाजप पक्षाला खूश करण्याच्या मनस्थितीत का नाही, यामागे काही मोठी कारणे आहेत जी महाराष्ट्राच्या राज्य नेतृत्वाने टाळली आहेत. खरे तर काही प्रमुख कारणे अगदी साधी होती पण आजच्या महाराष्ट्रातील भाजप पक्षाला ती फार महागात पडली आहे. महाराष्ट्रातील पहिली ज्वलंत समस्या म्हणजे शेतकरी आत्महत्या आणि बहुतांश शेतकरी मराठा समाजातील आहेत आणि रोज आत्महत्या करत आहेत. ही दुर्दैवी आत्महत्येची साखळी खूप दिवसांपासून सुरू आहे ही वेदनादायक आहे पण खऱ्या समस्येवर कोणीही संशोधन करत नाही. आणि प्रमुख शेतकरी समाज म्हणून मराठा समाजाला अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.आणि त्यातून ज्वलंत सामाजिक आर्थिक शैक्षणिक आणि नोकरी आणि शिक्षणाचा संकल्प लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय बनतो. त्यानंतर जालना जिल्ह्यातील अंतरवली सारथी या छोट्याशा गावात उपोषण सुरू झाले. कुणबी मराठा आरक्षणासाठीचे ते शांततेत उपोषण सक्तीने संपवण्याचा सरकारी आदेश पोलिसांच्या गोळीबारात झाला.कुणबी मराठा आरक्षणाचे नेतृत्व करणारा तरुण आणि गरीब शेतकऱ्याचा मुलगा श्री मनोज जी जरंगे पाटील हे आज महाराष्ट्रातील कोणत्याही राष्ट्रीय किंवा राज्याच्या नेत्यापेक्षा सर्वात लोकप्रिय आणि जननेते आहेत. मुळात भाजपने हा सामाजिक मुद्दा अतिशय हलक्यात घेतला. आणि केंद्र सरकारच्या धोरणात ते गेल्या ५ वर्षांपासून करत आहेत नेहमीप्रमाणे ते अगदी हलकेच घेतले.सामाजिक दृष्ट्या राजकीय आर्थिक दृष्ट्या औद्योगिक दृष्ट्या सर्वच बाबतीत महाराष्ट्र मागासलेले राज्य बनले आहे ही मराठी समाजाच्या मोठ्या वर्गाची जनमानसाची धारणा आहे.मराठी सरकारी शाळांचे खाजगीकरण आणि सर्व सरकारी शाळांची मालमत्ता अदानी कंपनीला सोपवल्याने आज लोकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक उद्योग आणि महत्त्वाची सरकारी व खाजगी औद्योगिक कार्यालये अहमदाबादला स्थलांतरित होणे, हा मराठी माणसाचा अपमान आहे, ही जनमानसाची धारणा आहे. आज महाराष्ट्राची राजकीय सामाजिक संस्कृती भाजपने राजकीय फायद्यासाठी पूर्णपणे विस्कळीत केली आहे हे कटू सत्य आहे पण सत्य बोलण्याचे धाडस कोणी करत नाही. शेवटी भाजपने त्यांचे मूळ मित्र कोणत्या राजकीय किंमतीवर गमावले आणि आता कोणत्याही राजकीय व्यक्तीला भाजपशी असलेल्या मैत्रीवर विश्वास नाही, ही आज महाराष्ट्राच्या राजकारणात परिस्थिती आहे. भाजप महाराष्ट्रात नवीन राजकारणाची स्वतःची संस्कृती प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु महाराष्ट्रातील लोक भाजपच्या या जबरदस्तीने बदललेल्या राजकीय वर्चस्व संस्कृतीवर खूश नाहीत. त्या आरशाच्या प्रतिकृती आज भाजपच्या लोकशाहीतील विजय-पराजयाच्या दारात थेट समोर येत आहेत. एक राजकीय विश्लेषक म्हणून इथे एक साधा प्रश्न पडतो की भाजप त्यांच्या खऱ्या मित्रांचे शत्रू का बनले आज ते सर्वस्व गमावून बसले आहेत एक दिवस भाजपसाठी महाराष्ट्र तमिळनाडूसारखा होईल. कारण महाराष्ट्राने ऐतिहासिकदृष्ट्या सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय भिन्न शौर्य आणि बलिदानाच्या मातीत स्वाभिमान मिळवला आहे. महाराष्ट्राच्या भूमीवर जगातील प्रत्येक समाजाला स्वीकारण्याचे मोठे हृदय असलेले महाराष्ट्र राज्य आज स्वाभिमान राखण्यासाठी लाचार झाला आहे. ही भावना प्रत्येक मराठी माणसाच्या मनात आहे. राजकीय सामाजिक आर्थिक आणि धार्मिक तसेच अध्यात्मिक आणि संत परंपरेने भारतच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडात खूप समृद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासाठी मुंबईच्या समुद्रात जगातील सर्वात मोठा पुतळा उभारण्याची घोषणा भाजपने जवळपास १० वर्षांपूर्वी केली होती. भाजपने स्वयंघोषणा केल्या असे कोणीही सांगितले नाही किंवा तसे करण्याची मागणीही केली नाही.पण दुर्दैवाने ट्रिपल इंजिन सरकारने श्री शिवस्मारकाबाबत काहीही केले नाही. भाजप सरकारच्या या निष्काळजीपणामुळे जनतेला अपमानास्पद वाटते कारण श्री छत्रपती शिवाजी महाराज हे मराठी संस्कृती आणि मराठी मातीचे प्राण आहेत. राजकीय सर्वेक्षणात या सामाजिक ऐतिहासिक आर्थिकदृष्ट्या औद्योगिकदृष्ट्या प्रत्येक क्षेत्राचा विचार अत्यंत संवेदनशील मनाने केला पाहिजे. पण आता राजकीय सर्वेक्षण जवळजवळ चुकीचे आणि भ्रष्ट असल्यासारखे आहे. आज महाराष्ट्रातील भाजपसाठी प्रत्येक सामाजिक राजकीय ऐतिहासिक चूक कधीही भरून न येणाऱ्या जखमेसारखी झाली आहे. भाजप आज जगातील सर्वात श्रीमंत पक्षांपैकी एक आहे, त्यांची सोशल मीडिया सेना आज जगातील सर्वात शक्तिशाली सेना आहे, परंतु ते खूप लहान गोष्टी विसरले आहेत की आपण देशातील लोकांचे मन जिंकू शकत न्यायाच्या भूमीत आणि हुकूमशाही मानसिकतेविरुद्धच्या लढ्याचा प्रकाश, ही मराठी संस्कृतीची आणि मातीची मूलभूत शिकवण आहे ती स्वराज्य संस्कृतीमुळे प्रत्येक मराठी माणसाला येते. आणि सर्वात लोकप्रिय महान ऐतिहासिक समाजसुधारक आणि भारताच्या संविधानाचे जनक भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हीच त्यांची भूमी अभिमानाने संघर्ष आणि स्वाभिमानाने ओळखली जाते. आज प्रत्येकाच्या मनात प्रचंड भीती कुठे आहे, भारताची राज्यघटना बदलण्यासाठी केंद्र सरकारला ४०० संसदीय जागा हव्या आहेत, ही प्रत्येक महाराष्ट्रीयनची अत्यंत गंभीर धारणा आहे. हे मोदी सरकार भारताची राज्यघटना बदलू शकते याची शाश्वती असलेल्या सामान्य माणसाला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अनेक दुरुस्त्या झाल्यामुळे अधिक भीती निर्माण झाली आहे. ३८% पेक्षा जास्त मतदारांनी मोदी सरकारच्या विरोधात मतदान केले कारण या पुष्टी धारणा आहे कारण सोशल मीडियावर भाजप समर्थक उघडपणे आव्हान देत आहेत की ते भारताचे संविधान बदलणार आहेत. भारताचे संविधान कोणीही बदलू शकत नाही हे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी साहेब नेहमी सांगत असतात पण त्यांचे समर्थक सोशल मिडीयावर उघडपणे धमक्या देत असतात पण कारवाई होत नाही. आणि मोदी सरकारबद्दल आणखी एक हमी सामान्य माणसाला आहे पण मोदी सरकार नोटबंदी सारखे काहीही करू शकते अचानक भारताचे संविधान बदलण्याचा निर्णय ४००+ संसदीय जागांवर विजय अवलंबून आहे आणि आता सामान्य माणूस भारताच्या संविधानाचे रक्षण करण्यासाठी आणि मोदी सरकारच्या विरोधात मत देण्यासाठी लढत आहे. आज राज्य आणि केंद्र सरकार अतिआत्मविश्वासाने पूर्णत: सर्वेक्षण कंपनीवर अवलंबून आहे. महाराष्ट्रात शिवसेनेच्या राष्ट्रवादी या पक्ष चिन्हावरून चातुर्याने कायदेशीर वाद निर्माण झाला. कोण करतंय सगळी जादू सामान्य माणूस गांभीर्याने पाहत आहे.महाराष्ट्राचा राजकीय भ्रम हा सामाजिक धारणेचा भ्रम बनला आहे आणि सामाजिक परिणामांचा हा भ्रम भाजपसाठी महाराष्ट्रात गंभीर राजकीय आणि सामाजिक समस्या निर्माण करत आहे.(वर्तमानाच्या राजकीय आणि सामाजिक विश्लेषणाचा पहिला भाग )

# लोकसभा निवडणुकीत पंकजाताई यांच्या खंबीर पाठीशी मेळाव्यात सैनिकांचा निर्धार

## सैनिकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी आम्ही सदैव तत्पर–आ.सुरेश धस

## आष्टीत आजी–माजी सैनिक वीर माता वीरच्या वीर पत्नी यांचा सैनिक मेळावा संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

देशाच्या सीमेवर सैनिक असल्यानेच आम्ही घरात शांत झोपत आहोत.आपल्याला येणाऱ्या अडचणी ह्या आम्ही सोडवण्यासाठी सदैव तत्पर असून आपली कसलीही तक्रार किंवा समस्या असेल ती आपण आमच्याकडे न येता सोशल मीडियाद्वारे पाठवली तरी ती सोडवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करू आमचे ते कर्तव्य आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी सैनिकांच्या मेळाव्यात संवाद साधताना केले.

आष्टी येथे आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील सर्व सैनिक बांधवांच्या अडीअडचणी तसेच समस्या जाणून घेण्यासाठी आष्टी शहरातील मोरेश्वर मंगल कार्यालय येथे शनिवार दि.२७ एप्रिल रोजी सकाळी ११ वा. त्रिदल आजी माजी सैनिक संघटनेचे महाराष्ट्र कोर कमिटीचे सदस्य महादेव खेडकर व तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले यांच्या अध्यक्षतेखाली सैनिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.या मेळाव्यास बीड,लातूर,धाराशिव मतदार संघाचे आ.सुरेश आण्णा धस प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा अध्यक्ष राजेंद्र कापरे महाराज,अहमदनगर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब आंधळे,त्रिदल क्रीडा अध्यक्ष हरिभाऊ चिरके,ज्येष्ठ सल्लागार अब्बास शेख, संचालक सरपंच सतिष ढवळे,कार्याध्यक्ष मुस्तफा शेख, भाऊसाहेब बांगर,महाराष्ट्र राज्याचे कोर कमिटी महादेव खेडकर,लक्ष्मण भोरे कॅप्टन, रामदास पालवे अकबर बेग,गणेश खाडे,शहाजी ढेपे, शिवाजी पवार,आष्टी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले,कार्याध्यक्ष प्रकाश परकाळे,माजी सभापती अंकुश चव्हाण,माजी जि.प.सदस्य महेंद्र तात्या गर्जे,युवा नेते गणेश शिंदे,नगरसेवक शरीफ शेख उपस्थित होते.यावेळी पदाधिकाऱ्यांनी आ.सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली बीड लोकसभा मतदारसंघाच्या भाजपा महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना बहुमताने




निवडून आणू असा विश्वास देत सर्व संघटनेच्यावतीने जाहीर पाठिंबा देत असल्याचे यावेळी जाहीर केले.यावेळी उपस्थित आजी माजी सैनिक व नातेवाईक यांना संबोधित करताना आ.सुरेश धस पुढे म्हणाले,देशाचे कार्यक्षम पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश आणि सैनिक अतिशय संरक्षणात्मक दिशा कडे जात आहे.सैनिकांना मोदी सरकार आल्यापासून अनेक सुखसुविधा देण्याचे निर्णय मोदी सरकारने घेतले आहेत.सीमेवरील हल्ल्याचे प्रमाण देखील कमी झाले आहे.सैनिकांना येणाऱ्या अडचणी आम्ही प्राधान्याने सोडवू अशी ग्वाही आमदार सुरेश धस यांनी देऊन येणाऱ्या बीड लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना आपण सर्व सैनिक वीरमाता,वीरपत्नी, आजी–माजी सैनिकांनी मतदान रुपी आशीर्वाद द्यावेत व देशाचे हात बळकट करावे असे आवाहनही शेवटी आ.सुरेश धस यांनी केले.यावेळी आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील त्रिदल आजी माजी सैनिक संघटनेचे यांच्यासह पदाधिकारी,आजी–माजी सैनिक,वीरमाता,वीर पत्नी,नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आभार महादेव खेडकर यांनी मानले.

## महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी आ.आजबे काका यांनी लोणी गट पिंजून काढला

**आष्टी । प्रतिनिधी**



बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या अधिकृत उमेदवार मा पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ आ.बाळासाहेब आजबे काका यांनी लोणी जिल्हा परिषद गटातील गाव भेट दौरा केला.यामध्ये खुंटेफळ वाटेफळ.लोणी,पिंपळा, सोलापूरवाडी, खुंटेफळ, पुंडी , पिंपळगाव दाणी, सराटे वडगाव, टाकळी ,रुई, फत्तेवडगाव व नांदा या गावांमध्ये जाऊन कॉर्नर बैठका व मतदारांच्या भेटी घेतल्या.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते काकासाहेब शिंदे,भाऊसाहेब लटपटे,जिल्हा उपाध्यक्ष धैर्यशील थोरवे सरपंच अशोक पोकळे, राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष भाऊसाहेब घुले, हरिभाऊ दहातोंडे, सुभाष वाळके,अर्जुन काकडे,यावेळी जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब लटपटे ,धैर्यशील थोरवे काकासाहेब शिंदे,नगरसेवक नाजीम शेख अशोक पोकळे सुभाष वाळके , चंद्रगुप्त खलाशे, उद्धवशेठ मोडवे ,महादेव अमृते, बाबा कोहक, गणेश सासवडे, राजू वाघमोडे, अनिल गाडे, संतोष गुंड, आजिनाथ बेल्हेकर, भगवान रक्ताटे, सुभाष भोसले, एकनाथ वाळके, अक्षय सावरे, बाबासाहेब सावरे, भिकाजी वाळके, रामकिसन वाळके चांद भाई सय्यद, नितीन मिसाळ, विजय गायकवाड, जनार्दन भोर, बलभीम काळोखे,अशोक कुताळ, मारुती मुळे, कुंडलिक शेंडगे, सतीश अरुण, राजेंद्र शिंदे, विनोद शिंदे, राहुल अरुण, रामभाऊ सायबर, अशोक भिटे, रावतात्या भस्मे, ज्ञानदेव मिसाळ, बबन अनपट, शिवाजी मुकीनंद, भीमराव बोडके, सरपंच बबनराव ननवरे, कोंडीराम झांबरे, शिवदास ननवरे, बाबुराव सुंबरे, गोवर्धन संबरे, आप्पा महाराज सुंबरे श्रीरंग बापू तरटे शेख नवी गोरख शिंदे गोरख मिसाळ दादा राऊत शामराव फसले भिवाजी सासरे रामकिसन वाळके अर्जुन काकडे शिवाजी थोरवे बबन थोरवे महादेव थोरवे सुदाम खांदवे संजय थोरवे राजू खांदवे राजू मोरे श्रीधर भालेराव भास्कर थोरवे काशिनाथ थोरवे संजय काकडे संदीप जगदाळे नानाभाऊ वाडेकर दिलीप थोरवे विलास काकडे कृष्णा गलांडे पांडुरंग भालेराव दत्तू भालेराव हिंमत काकडे कांतीलाल थोरवे नवाजी काकडे ऋषिकेश काकडे बळीराम वाडेकर ज्ञानेश्वर भालेराव तुळशीराम थोरवे यांच्यासह खुंटेफळ वाटेफळ, लोणी,पिंपळा, सोलापूरवाडी, कुंटेफळ ,पुंडी, पिंपळगाव दाणी, मेहेकरी, सराटेवडगाव, रुई,नांदा व फत्तेवडगाव इत्यादी गावातील राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते ,मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्रकार संतोष भुतेकर यांना धमकी देणाऱ्या विरुद्ध पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी

**अंबड (वृत्तसंस्था)**

जालन्यातील पत्रकार आणि दै. जगाचा जगमित्रचे संपादक संतोष भुतेकर यांना फोनवरुन धमक्या आणि शिविगाळ करणाऱ्या भाजपा उमेदवार रावसाहेब दानवे यांचे तथाकथित कार्यकर्ते शिवाजी गायकवाड यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करण्यासह संतोष भुतेकर यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे अशी मागणी अंबडच्या पत्रकारांच्या वतीने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, सध्या संपुर्ण देशात लोकसभेच्या निवडणुका आणि प्रचाराची रणधुमाळी जोरात आहे. जालन्यातील दै. जगाचा जगमित्र हे एक नियमित आणि प्रभावी वृत्तपत्र म्हणून जालना जिल्ह्यासह मराठवाडा परिसरात परिचित आहे. पत्रकार कधीही एखांद्या ठराविक पक्ष संघटनेशी बांधीलकी किंवा विरोध म्हणून पत्रकारीता करत नाहीत.

दै. जगाचा जगमित्र आणि त्या वृत्तपत्राचे संपादक संतोष भुतेकर हे त्यांच्या वृत्तपत्रातून निवडणूक काळात विविध पक्ष संघटनांच्या बातम्या सातत्याने आग्रही भूमिकेतून प्रसिध्द करत आहेत. तथापि त्यांनी त्यांच्या वृत्तपत्रातून प्रसिध्द केलेल्या भाजप उमेदवारांच्या संदर्भातील बातम्या वाचून संपादकांना थेट फोनवर धमकावणे, त्यांच्या माता–पित्यांचा शिवराळ भाषेत उल्लेख करणे, घरात घुसून मारण्याच्या तयारीने वाट्टेल ते वक्तव्य करणे. या सर्व गोष्टी अतिशय गंभीर स्वरूपाच्या आहे.

या प्रकरणी किरकोळ स्वरूपाचा अदखलपात्र गुन्हा दाखल करून पत्रकारांवर एकप्रकारे अन्याय केला आहे. तसेच पोलीस आणि प्रशासनाकडूनही नेमकी कारवाई अपेक्षीत आहे. यास्तव आपण या गंभीर प्रकरणात लक्ष घालून संबंधीत आरोपीविरूध्द पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करून श्री भुतेकर यांना पोलीस संरक्षण द्यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली.यावेळ संतोष जिगे पाटील, शिवाजी मस्के, गिताराम मते , अशोक गाढे, सिध्देश्वर उबाळे, अनिल भालेकर , शेख फारुक, सोहेल चाऊस, जहिर शेख, संजय उपाध्ये, सय्यद नाजिम, रफिक शेख, गोंविद खरात, भरत टकले, श्रीधर कापसे, बाबासाहेब खरात, सगीर बिल्डर, सुरेश खरात आदींसह व्हाईस ऑफ मिडिया व मराठी पत्रकार संघ, पत्रकार संरक्षण समिती अंबड यांची उपस्थिती होती.

### बदलू जुनी कहाणी


पाखरांची किलबिल,होता रम्य पहाट
सूर्योदयाने झाला अंधाराचा नायनाट
चला उठून करूया आज काही तुफानी
बदल नवे घडवून,बदलू जुनी कहाणी

नित्य नव्या दिवसाचा,असतो नवा थाट
आव्हानांना सामोरे जाऊ,करून मान ताठ
हाता मधल्या शक्तीला जागे करूया आज
मेहनत करण्यासाठी, नकोच कसली लाज

जिद्द भरू मनामध्ये,प्रचंड आत्मशक्ती
वेळ पडता शक्ती नको,वापरुया युक्ती
जीवन हे कठीण,जर जाणले ना स्वतःला
तू तुझाच सारथी हो, रणांगणी या रथाला

रडू नको दुःख पाहता,भीती नको मनी
यशाचा मूलमंत्र मेहनत,पक्का धर ध्यानी
उठ जागा हो लढण्या, सांग तू मनाशी
जिद्द पेटता जित पक्की,झुंज संकटाशी

अनुभव घे थोरांचा,तोच पाया जीवनाचा
संचय कर सद्गुणांचा,नको क्षणिक धनाचा
धैर्य धर ध्यानी मनी,नको करू संताप
शिल्पकार तू तुझाच, कर नवा प्रताप



**पवन कुसुंदल,नांदेड**
**मोब.९०७५५९५६९५**

## दुबईत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी



**मुंबई । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले जयंतीचे औचित्य साधून शिवाजी काका ग्रुप तर्फे दुबईमध्ये भव्य दिव्य व लेझीमच्या गजरात जयंती सोहळा आयोजित करण्यात आला. दिनांक २१ एप्रिल २०२४ रोजी हा सोहळा ग्लॅण्डले इंटरनॅशनल स्कूल दुबई येथे संपन्न झाला. या सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून श्री चंद्रशेखर जाधव,श्री अभिजीत देशमुख, प्रवीण वराडकर,डॉक्टर अनिल बनकर,रत्नाकर दंडवते,उदय मोरे, रमा काळे,सुलोचना मुंगे हे उपस्थित होते. मान्यवर पाहुण्यांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याची महती आणि समाजासाठी दिलेले महत्वाचे योगदान यावर अभ्यासपूर्वक भाषणे केली. या कार्यक्रमांमध्ये रोषणाई आणि सांस्कृतिक कार्यक्रम बहारदार होण्यासाठी डीजे निखिल यांचा मोठा सहभाग लाभला. तर सागर जाधव ( एस.जे.लाईव ) यांनी हा कार्यक्रम फेसबुक लाईव माध्यमातून जगातील सर्व समाज बांधवांपर्यंत पोहचविला.

श्रीमंत ढोल ताशा पथक यूएई चे वादन हे कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले, भारतीय संस्कृतीचे दर्शन, नव्या पिढीसमोर आपल्या थोरवीरांच्या गाथा आणि त्यांची महती सादर करण्यात आली, जेणेकरून आपल्या पिढीला आपल्या वीर लोकांची माहिती मिळेल. श्री रत्नाकर दंडवते,डॉक्टर अनिल बनकर,उदय मोरे

यांनी कार्यक्रमांमध्ये विविध नृत्य,आंबेडकरांवरील गीते, पोवाडा व असे इतर बहारदार कार्यक्रम झाले. दुबईतील तमाम मराठी बांधवांनी येऊन या कार्यक्रमाची शोभा वाढवली. शिवाजी काका गृह एक सामाजिक महिलांसाठी मदतीस

तत्पर असलेला ग्रुप आहे. या कार्यक्रमात महिलांना गोल्डन ग्लोरी टेकनिकाल कंपनी तर्फे लॉन्ग सर्विस अवॉर्ड प्रदान करून त्यांना गौरवण्यात आले व त्यांनी घेतलेल्या मेहनतीची व कष्टाची नोंद घेण्यात आली. शिवाजी काका ग्रुपमध्ये दुबई सारख्या ठिकाणी घरकामे करून आपला संसाराला हातभार लावणारा महिलांचा सहभाग आहे. आपल्या कामातून वेळात वेळ काढून हा कार्यक्रम सर्व महिलांनी मिळून सादर केला आणि समाजाला दाखवून दिले की आम्हीही आपल्या समाजातील एक अविभाज्य घटक आहोत.

या कार्यक्रमाच्या आयोजन आणि यशस्वी होण्यासाठी शिवाजी नरूणे, साक्षी मोरे, सूचना नाईक, विठोबा अहिरे, चंद्रशेखर जाधव, संतोष भस्मे, मिलिंद मानके, किशोर मुंडे व इतर सहकार्यांनी अथक मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूचना नाईक. सौ साक्षी गणेश मोरे व शिवाजी काका ग्रुपचे अध्यक्ष श्री शिवाजी काका नरूणे यांनी केले.

## खा.रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ प्रभाग क्र.चार मध्ये महायुतीची प्रचार फेरी संपन्न



**सांगोला । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, आरपीआय (आठवले गट), रासप, रयत क्रांती संघटना महायुतीचे अधिकृत उमेदवार खा. रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांच्या प्रचारानिमित सांगोला शहरातील प्रभाग क्रमांक चार मध्ये होम–टू–होम प्रचार फेरी संपन्न झाली. माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी व पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना देशाचे पंतप्रधान करण्यासाठी सर्वांनी भाजपला मतदान करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

यावेळी सांगोला नगरपरिषदेचे मा. नगरसेवक तथा गटनेते आनंदा माने, भाजप तालुकाध्यक्ष अतुल पवार, मनसेचे जिल्हाध्यक्ष विनोद बाबर, मा. नगरसेवक अस्मिर तांबोळी, मा. नगरसेवक माऊली तेली, मा. नगरसेवक सोमेश यावलकर, सूर्यकांत मेटकरी, प्रभाकर घोंगडे, राजेश खडतरे, सचिन शिर्के, काशिलिंग गावडे, भाजप शहराध्यक्ष प्रविण जानकर, शिवाजी गावडे, मानस कमलापूरकर, देविदास गावडे, आशपाक मुलानी, राहुल गेजगे, बिरा खांडेकर, महेश कदम, पवन सपाटे, प्रसाद जिरगे, रवी पवार, संतोष देवडकर, रोहित पवार, रोहित गेजगे, सुमित भोसले, राहुल सुतार, राहुल दिवटे, लखन पवार, निशिकांत तेली, दत्तात्रय तेली, ज्ञानेश्वर गाडेकर, अजिंक्य माने, प्रीतेश सादिगले आदी उपस्थित होते.

## खा. प्रितमताई मुंडे यांचा वाड्या-वस्त्यांवर पोहोचून प्रचार

# तुमच प्रत्येक मत जिल्ह्याच्या विकासाला गती देईल-खा.प्रितमताई

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात पायाभूत सुविधांसह अनेक अभूतपूर्व विकास कामे पूर्ण झाली आहेत. जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना पंकजाताई मुंडे यांनी सर्व घटकांना मागणीनुसार निधी उपलब्ध करून दिला, विकास कामांसाठी निधी देताना त्यांनी कधीही भेदभाव केला नाही, कुणाचा आकस अथवा द्वेष केला नाही. प्रत्येक गावाला आणि वाड्या-वस्त्यांना त्यांनी मागेल तेवढा विकास निधी हक्काने उपलब्ध करून दिला, मधील पाच वर्षाच्या काळात विकासाची ही प्रक्रिया मंदावली होती. लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून पुन्हा एकदा जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याची संधी आपल्याकडे चालून आली आहे. या संधीचा सदूपयोग करून आपल्या हक्काचा प्रतिनिधी पंकजाताईंच्या रूपाने दिल्लीत पाठवा, पंकजाताईंना तुम्ही दिलेल प्रत्येक मत हे जिल्ह्याच्या विकासाला गती देणार असेल' अशी ग्वाही खा. प्रितमताई मुंडे यांनी मोरेवाडी जिल्हा परिषद गटातील मतदारांना दिली.

भाजप आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारानिमित्त अंबाजोगाई तालुक्यातील कुरनवाडी, येल्डा,चिचखंडी, राक्षसवाडी, ममदापुर, पठाण मांडवा, काळवटी तांडा, साकूड, शेपवाडी या गावांना भेटी दिल्या. यादरम्यान मतदारांशी संवाद साधताना खा. प्रितमताई मुंडे बोलत होत्या. केज विधानसभेच्या आ. नमिता मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा, बालासाहेब दौडतले, बालासाहेब शेप, मधुकरराव काचगुंडे,अच्युत गंगणे,लक्ष्मण करनर, दिलीप चामनर,बाळा गायके यांच्यासह भाजप आणि महायुतीचे कार्यकर्ते या प्रचार दौऱ्या यादरम्यान उपस्थित होते.पुढे बोलताना खा.प्रितमताई मुंडे म्हणाल्या की 'बीड जिल्ह्यातील मतदारांनी सातत्याने आम्हाला जनतेची सेवा करण्याची संधी दिली आहे, त्या संधीचा सदुपयोग करत सर्वसामान्यांचे कष्ट कमी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही पंकजाताईंच्या नेतृत्वात केला आहे. आम्ही केलेला विकास हाच आमचा विश्वास असल्यामुळे बीडची जनता पुन्हा एकदा पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून सेवेची संधी आम्हाला देणार आहे, कारण पंकजाताई या प्रामाणिक, स्वच्छ आणि नीतिमत्ता असलेल्या उमेदवार आहेत. लोकसभेत पंकजाताई मुंडे यांचा विजय निश्चित आहे, या विजयात पंकजाताईंना मतदान करून सन्मानजनक मताधिक्य मिळवून दया असे आवाहन याप्रसंगी खा. प्रितमताई मुंडे यांनी ठिकठिकाणी केले. महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी पालकमंत्री असताना मोरेवाडी जिल्हा परिषद गटातील डोंगरदऱ्यात वसलेल्या वाड्या-वस्त्यांना विकासाचा स्पर्श दिला आहे, आजपर्यंत पंकजाताईंनी आम्हाला न मागता विकास निधी उपलब्ध करून दिला. आम्हाला हक्काने पायाभूत सुविधा, रस्ते, आरोग्य व्यवस्थेशी निगडित सुविधा देणाऱ्या पंकजाताईंना लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून काहीतरी देण्याची संधी आम्हाला मिळाली आहे. मोरेवाडी जिल्हा परिषद गटातील मतदार म्हणून या संधीचा आम्ही पुरेपूर उपयोग करत केज मतदारसंघातून आमचा गट सर्वाधिक मताधिक्य देईल' असा निर्धार यादरम्यान ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींनी केला.



# मेहेर इंग्लिश स्कूलचे पथनाट्यातून मतदार जागृती अभियान





**अहिल्या नगर । प्रतिनिधी**

भारतीय संविधानाने प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिला आहे.मतदार जागृती अभियानात मेहेर इंग्लिश स्कूलच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मतदानाचा हक्क बजावणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.मतदान करूया देशाचे उज्वल भवितव्य घडवूया.असे प्रतिपादन मेहेर इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापिका प्रा.अनुरीता झगडे यांनी केले आहे.


हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलच्या वतीने बसस्थानका जवळ छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर पथनाट्य सादर करून मतदार जागृती अभियान राबविण्यात आले.छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून पथनाटयाची सुरुवात करण्यात आली.मतदार राजा जागा हो लोकशाहीचा तु धागा हो. हे ब्रीदवाक्य घेऊन व आचारसंहितांचे नियमांचे काटेकोरपणे पालन करून पथनाट्य सादर करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शाळेचे चेअरमन जगदीश झालानी व हिंद सेवा मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.याप्रसंगी शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस उपनिरीक्षक शमुवेल गायकवाड,मेहेर इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका प्रा.अनुरीता झगडे,मोनिका बामदळे,गीता वल्लाकट्टी,अश्विनी रक्ताटे,शीतल दळवी,विमल आवारे,ऐमन बागवान,समीना शेख,विनिता पटवेकर,आशा घोरपडे,किरण साठे तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

# अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालयास स्वच्छतेसाठी व्हॅक्यूम क्लिनर भेट

**अहमदनगर । प्रतिनिधी**

पाचशेपेक्षा अधिक वर्षाचा इतिहास असलेल्या शहराचा ऐतिहासिक ठेवा जतन करणाऱ्या अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्रास श्री गोपाल रामनाथ धूत फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या वतीने स्वच्छतेसाठी व्हॅक्यूम क्लिनर भेट देण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी रोटरीच्या अध्यक्षा देविका रेळे, प्रतिभाताई धूत, वैशाली कोलते, सविता काळे , आर्किटेक मिनल काळे, सुजाता वाबळे, संग्रहालयाचे कार्यकारी विश्वस्त डॉ. रवींद्र साताळकर, अभिरक्षक डॉ. संतोष यादव, कर्मचारी नारायण आव्हाड, आनंद कल्याण, रामदास ससे, गणेश रणसिंग, बापू मोढवे, संतोष दांगडे, कृष्णा धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रतिभाताई धूत म्हणाल्या की, राज्यातील सुसज्य संग्रहालयांपैकी अहमदनगर संग्रहालय हे एक आहे. मोठा ऐतिहासिक ठेवा संग्रहालयात जतन करण्यात आला आहे. शासनाकडून अनुदान न घेता वस्तुसंग्रहालयाचे मोठे कार्य उभे राहिले आहे. या कार्याला अधिक वैभवता प्राप्त करण्यासाठी व हा ऐतिहासिक वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

रोटरीच्या अध्यक्षा देविका रेळे यांनी ऐतिहासिक वस्तू संग्रहालय अहमदनगरची वेगळी ओळख निर्माण करेल. भावी पिढीला आपल्या पूर्वजांचा इतिहास जतन करण्यात आलेल्या ठेव्यातून माहिती होणार असून, रोटरी प्रियदर्शनीच्या माध्यमातून वस्तू संग्रहालयास मदत केली जाणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.डॉ. रवींद्र साताळकर यांनी पाहुण्यांचे स्वागत करुन संग्रहालयात ऐतिहासिक वास्तू आधुनिक पद्धतीने मांडण्यात आले असून, त्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरत आहे. सर्वांच्या सहकार्याने संग्राहलय सुसज्ज झाले असल्याचे स्पष्ट केले. आभार डॉ. संतोष यादव यांनी मानले.

# विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अभिरूप न्यायालयाच्या माध्यमातून वकिली व्यवसायाची कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे-न्या.राजेंद्र अवचट

**अहमदनगर । प्रतिनिधी**

विधी महाविद्यालयाने अभिरूप न्यायालय आयोजित करून विद्यार्थ्यांना वकिली व्यवसायाची कौशल्ये विकसित करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. अशा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन चांगला वकील होण्यासाठी या व्यवसायाची तंत्रे आणि कौशल्ये विकसित करावीत, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राजेंद्र अवचट यांनी केली.

अहमदनगर न्यू लॉ कॉलेजमध्ये न्यायमूर्ती कै. एस. बी. म्हसे पा. सहाव्या राज्यस्तरीय अभिरूप न्यायालय स्पर्धेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राजेंद्र अवचट यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, तसेच व्यासपीठावर सचिव ड. विश्वासराव आठरे पा., खजिनदार ड. दीपलक्ष्मी म्हसे, प्रधान जिल्हा न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, दीपक दरे, ड. माणिक मोरे, प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, स्पर्धा समन्वयक प्रा.




विजयकुमार शिंदे उपस्थित होते.

अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे म्हणाले की, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कार्याचा आढावा मांडून संस्थेचा शैक्षणिकदृष्ट्या आलेख उंचावत चाललेला आहे, तसेच संस्थेच्या उभारणीत वकिलांचा फार मोठा सहभाग आहे. अशा अभिरूप न्यायालय स्पर्धेच्या माध्यमातून उत्कृष्ट वकील घडविण्याचे काम होत असते, तसेच प्रधान जिल्हा न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

उद्घाटन समारंभात दीपप्रज्वलन करून कै. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत ड. माधवेश्वरी म्हसे यांनी करताना कै. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे पाटील यांच्याविषयी माहिती देताना म्हसे पाटील यांनी शेतकरी, कामगार यांच्यासाठी निःस्वार्थीपणे योगदान देताना वकिली व्यवसायाची उंची वाढविली आणि विविध संस्थांवर काम करताना अभ्यासपूर्ण आपले म्हणणे न्यायव्यवस्थेसमोर मांडून गरीबांना न्याय मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. पाहुण्यांची ओळख प्रा. डॉ. बी. डी. पांढरे यांनी करून दिली, तसेच आभार प्रदर्शन प्रा. सुहास तोरडमल यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. प्रियंका खुळे यांनी केले. संयोजन समितीचे ड. सुभाष भोर, आर्किटेक्ट सौ. राजेश्वरी जगताप, जिल्हा सरकारी वकील ड. सतीश पाटील, सौ. अलका जंगले, श्रीमती निर्मला काटे, ड. नरेश गुगळे, ड. अशोक कोठारी, ड. शहाजी दिवटे, प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे, अभिरूप न्यायालयाचे न्यायाधीश आदी उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ. बी. डी. पांढरे, डॉ. अतुल मोरे, प्रा. गिरीश हिरडे, प्रा. आर. डी. भवाळ, डॉ. आर. बी. दुसुंगे, कार्यालयीन अधीक्षक परशुराम म्हस्के, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये द्वितीय वर्ष डी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न

**सांगोला । प्रतिनिधी**

सहयाद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे या महाविद्यालयात द्वितीय वर्ष डी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे उदघाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते सरस्वतीमातेच्या फोटोचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाले.प्रथमतः संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या व उपस्थित प्राध्यापकांच्या हस्ते द्वितीय वर्ष डी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.विद्यार्थी चि.रोहित खटके व चि.प्रतीक पवार यांनी आपल्या मनोगतात सह्याद्री मधील दोन वर्षातील प्रवास व अनुभव विशद केला.सह्याद्री फार्मसी कॉलेज हे जुने अनुभवी कॉलेज असून या महाविद्यालयात उपलब्ध असणारे तंज्ञ प्राध्यापक, शिस्त, अद्यावत उपकरणे, सुसज्य ग्रंथालय, अत्याधुनिक प्रयोगशाळां व सर्व केमिकल्स यांची उपलब्धता, अभ्यासमय व निसर्गमय परिसर, सोयीयुक्त वसतिगृह, प्रशस्त कॅन्टीन, कॉलेजने विद्यार्थ्यांसाठी स्वतः केलेली निरंतर वाहतुकीची व्यवस्था अश्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध असून कॉलेजने आम्हास फार्मसी अभ्यासाबरोबरच गोवा येथील आंतराष्ट्रीय फार्मसी कंपनी सिप्ला फार्मा व ब्लू-क्रॉस लॅब या कंपनीस दिलेल्या भेटी, प्राथमिक आरोग्य केंद्र भेट, जलशुद्दीकरण केंद्र भेट, महाविद्यालयाने वेळोवेळी आयोजित केलेले वर्कशॉप, सेमिनार, गेस्ट लेक्चर, कॉन्फरन्स, ट्रैनिंग प्रोग्राम व इतर उपक्रम राबवले त्यामुळे आम्हास त्याचा भरपूर फायदा झाला व भविष्यात हि होणार आहे असे मत व्यक्त करून सर्वांचे आभार मानले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन प्रा.सौ.पी.आर.ताटे यांनी केले.

# कडलास येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक उत्साहात साजरी



**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुक्यातील कडलास येथे भिमज्योत बहुद्देशीय मंडळा वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक उत्साहात साजरी.

मिरवणूकीचे उद्घाटन सांगोल्याचे मा. नगरसेवक सुरजदादा बनसोडे यांच्या हस्ते झाले यावेळी प्रमुख उपस्थिती कडलास गावाचे माजी उपसरपंच सुनील काका पाटील, सरपंच दिगंबर भजनावळे, पोलिस पाटील रघुनाथ ननवरे, ठोकळे साहेब, आदी मान्यवराचे सत्कार जयंती मंडळ अध्यक्ष सुनील ठोकळे, उपाध्यक्ष सत्यवान ऐवळे, खजिनदार राजकुमार मोरे, राकेश तोरणे,सतिश ठोकळे, अशोक ठोकळे, महादेव ठोकळे, अनिल ठोकळे यांनी उपस्थित मान्यवरांचे सत्कार व सर्व नियोजन पारपाडले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .